नियमित दिवाणी दावा क्रं १४४/२०१७
जुना क्रं.५६१/२०११
प्रभाकर वि. श्रीराम+३
नि.क्र.१०३

## साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर पूढे सुरु

## वादीतर्फे श्री.ए.बी.पोंगडे

७. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शेताची मोजणी सर्वप्रथम सन १९९३ मध्ये केली. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीदारांना मी मोजणीचेवेळी वहिवाट दाखविली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर वहिवाटीप्रमाणे मोजणीदाराने मोजणी केली. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजणीमध्ये वादी यांचे माझे शेतात कुठलेही अतिक्रमण आढळून आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, जागेमध्ये तफावत आढळून आल्यामुळे मोजणीदाराने जमीनीच्या हद्द कायम करुन दिल्या नव्हत्या. मी सदर मोजणीबाबत उप-अधिक्षक भुमी अभिलेख यांचे कार्यालयात कुठलाही आक्षेप नोंदविला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मोजणीदार यांनी केलेली संपूर्ण कार्यवाही मला मान्य होती व त्यामुळे मी त्याबाबत आक्षेप नोंदविला नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, दि.२१.०१.१९९४ रोजी वादी यांनी स्वता:ची शेती मोजली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजणीचेवेळी माझे वडिल गोपाळराव रामचंद्र निखाडे हे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोजणीस मी किंवा माझ्या वडिलांनी कुठलाही आक्षेप घेतला नव्हता. सदर आक्षेप घेतल्याबाबत कागदोपत्री पुरावा आहे किंवा नाही, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी वादी विरुध्द अतिक्रमण काढून मिळण्याकरीता प्रतीदावा केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी यांचे माझे शेतावर कुठलेही अतिक्रमण नाही त्यामुळे मी वादी विरुध्द अतिक्रमण काढण्याकरीता प्रतीदावा केलेला नाही. एकत्रीकरण

DISTRICT COURT NAGPUR

योजणेदरम्यान वादी यांच्या जमीनीचे क्षेत्रफळ वाढल्याचे व माझ्या जमीनीचे क्षेत्रफळ कमी झाल्याचे मला माहिती नाही. महसुल रेकॉर्डनुसार माझ्या मालकीचे क्षेत्रफळ कायम राहिल्यास वादी याचे क्षेत्रफळ वाढण्यास माझी हरकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी यांच्या शेतातुन माझा वहिवाटीचा मार्ग नाही. साक्षीदार सांगतात की, माझा वहिवाटीचा मार्ग माझ्या शेतातुनच आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे व खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**
**<u>फेरतपास काही नाही.</u>**

समक्ष

श्रवणोत्तर स्विकृती

(एस. के. फोकमारे)
दि.न्या.व.स्तर, उमरेड
उमरेड

(एस. के. फोकमारे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर.,
दिनांक : २३/०९/२०१९.

DISTRICT COURT NAGPUR